**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1407 / 2007.**

श्री सुधाकर काशिराम चव्हाण

मु.पो. पांगरबंदी ता. मालेगाव जि.वाशिम 444503 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

जिल्हा परिषद कार्यालय बुलढाणा

2) जन माहिती अधिकारी तथा

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.11.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कागदपत्र दाखल केलेले दिसून येत नाही. मात्र त्यांचे तर्फे जन माहिती अधिकारी हे हजर आहेत असे आयोगास त्यांनी सांगितले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.8.2006 रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे दि. 9 जुलै 2006 रोजी पशुधन पर्यवेक्षक (वि जा अ) मधील घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेमधून मुलाखतीस पात्र ठरलेले सहा उमेदवाराचे माहिती संदर्भात 1) पशुधन पर्यवेक्षकाचे मार्कस 2) लेखी परिक्षेचे मार्कस 3) तोंडी (मुलाखत) परिक्षेचे मार्कस व इतर तपशिल देण्यात यावा.

(2) निवड झालेल्या उमेदवारामध्ये 1) अर्जासोबत पदविका जोडलेली नव्हती 2) इंटरशिप केलेली नाही 3) डामेसाईल जोडलेले नव्हते 4) पदविका 3 ते 5 प्रयत्नात पास झालेले असतांना त्यांची निवड झाली व मी परिपुर्ण असतांना मला का डावलण्यात आले याचा संपुर्ण पशिल देण्यात यावा. अशी महिती रजिष्टर टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते.

टिप : उपरोक्त पैकी जी कागदपत्रे आपण देण्यास असमर्थ असाल त्याची कारण मिमांसा मुदतीत कळवून बाकी प्रमाणित प्रती मुदतीत घ्याव्यात. आवश्यक खर्च मी आताच भरण्यास तयार आहे. पत्र आपणास लेखी द्यावे म्हणजे त्वरीत रकमेचा भरणा करु शकेल. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसात माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे त्यांनी दि. 26.9.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून कमिश्नर कार्यालय अमरावती महसुल विभाग अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 11.10.2006 रोजी उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने अर्ज या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. उक्त अर्जात माहितीचा अधिकार 2005 बाबत मागविण्यात आलेली माहिती या कार्यालयास दि. 16.10. 2006 रोजी खास दुतामार्फत पाठविण्यात यावी. सदर बाबीस प्राधान्य देण्यात यावे असे आयुक्त अमरावती विभाग यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा जिल्हा परिषद बुलढाणा यांना कळविलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 17.8.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा येथे अपीलकर्ता यांना जा.क्र. उजिप/पसवि/स्थानिक–2/369/06 बुलढाणा जिल्हा परिषद बुलढाणा (पशुसंवर्धन विभाग) दि. 7.9.2006 प्रमाणे सदर माहिती मिळण्याकरीता या कार्यालयास संपर्क साधून रु. 25 शासन शुल्क भरणा करुन आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल करीता शासन शुल्क त्वरीत आपण भरणा करावे. माहितीस्तव असे कळविलेले दिसून येते. मात्र त्याकरीता जावक नोंदवहितील नोंदीच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या नाहीत तसेच जावक क्रमांक व तारीखही आयोगाकडे दाखल केलेल्या छायांकित प्रतिवर शाईने लिहिलेले आहे. सही ही शाईने केलेली आहे. व अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरचे पत्र त्यांना मिळालेले नाही. प्रथम अपील दाखल केल्यानंतर दि. 12.1.2007 रोजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांनी अपीलकर्ता यांना रु. 25 चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दि. 31.10.2007 रोजी आयुक्त अमरावती विभाग यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यानुसार दि. 31.12.2007 रोजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी आयुक्त अमरावती यांना अर्जदाराने आवश्यक ते शुल्क भरणा केला नसल्यामुळे आवश्यक ती माहिती पाठविता आली नाही असे कळवून अपीलकर्ता यांना सदरच्या पत्राची प्रत दिलेली दिसून येते. दि. 31.12.2007 च्या पत्राच्या संदर्भात जावक नोंदवहितील नोंदीची मात्र छायांकित प्रत दाखल केलेली आहे. यावरुन यापैकी कोणतेही पत्र अपीलकर्ता यांना मिळालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.8.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती तर उपलब्ध करुन दिलेलीच नाही परंतु कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. दि. 7.9.2006 चे पत्राची छायांकित प्रत ही संशयास्पद वाटते. व त्यानंतर काहीही पत्र पाठविलेले असले तरी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे तो निरर्थक आहे. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती जर विहित मुदतीत

उपलब्ध करुन दिली नाही तर ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे कलम 7 चे पोटकलम (6) मध्ये म्हटलेले आहे. असे असले तरी जन माहिती अधिकारी हे एक वर्षाच्या कालावधीच्या नंतर सुध्दा विहित शुल्क भरलेले नाही म्हणून माहिती दिली नाही असेच कळवित आहे. माहिती उपलब्ध करुन दिली ही सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची असते. परंतु दि. 7.9.2006 चे पत्र याबाबत जावक नोंदवहितील कोणतीही नोंद दाखविण्यात आलेली नाही व त्यावरील जावक क्रमांक, तारीख किंवा सही हे सुध्दा शाईने लिहिलेले दिसते. व सदरचे पत्र अपीलकर्ता यांना त्यांच्या दिलेल्या पत्त्यावर मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन सदरचे पत्र पाठविले नाही हा निष्कर्ष काढता येतो. व त्याची जबाबदारी हे संबंधित जन माहिती अधिकारी यांची आहे. अपीलकर्ता यांनी जरी माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपील हे वरिष्ठ अधिका–याकडे केलेले असले तरी त्यांना त्याबाबत मार्गदर्शन केलेले दिसून येत नाही व तशी तरतुदी ही अधिनियमात सुध्दा आहे व त्यामुळेच त्यांना योग्य वाटेल अशा अधिका–याकडे अर्ज दाखल केलेले दिसून येते. तरी पण सदरचे अर्ज किंवा अपील हे संबंधित अधिका–याकडे हस्तांतरीत झालेले आहे व त्यानंतरही विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. तसेच संबंधित माहिती ही अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळुन येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी न घेता व निर्णय न देता प्रशासकीय पत्राचा आधार घेतलेला दिसून येतो व त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे कोणत्याही प्रकारचे ज्ञान नाही असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे. परंतु तत्कालीन जन

माहिती अधिकारी श्री पी. एस. चव्हाण जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे होते परंतु त्यांची बदली झाली असल्यामुळे ते आज आयोगाच्या समोर सुनावणीस हजर नाहीत असे विद्यमान जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी सांगितले. कलम 20 (1) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द शास्ती लादावयाची असल्यास परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे आवश्यक असते परंतु त्यांची बदली झालेली असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकुन घेणे आज शक्य नाही त्यामुळे त्याबाबत जबाबदारी ही आयुक्त अमरावती विभाग यांनी निश्चित करुन त्यांचे विरुध्दची कार्यवाही ही करणे सुयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने त्यांच्या दि. 17.8.2006 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती छायांकित प्रतिसह विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच दि. 7.9.2006 चे पत्र हे संशयास्पद आहे असे दिसत असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– शास्ती लादण्यात येत असून आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी जबाबदारी निश्चित ठरवून दरमहाच्या वेतनातून वसुल करुन तसे आयोगास तीन महिन्याचे आत अहवाल सादर करावा.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 19.4.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1408/2007.**

श्री मुरलीधर सदाशिव जुमळे
रा. मंगलधान कॉलनी, राधिका नगर जवळ,
नविन बायपास, अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. के. पवार, प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अमरावती
2) श्री प्रदिप नानोटे, जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल,
जलाराम नगर, अमरावती ..... **उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांना माहिती कोणत्या तारखेला व काय माहिती विचारली असता त्यांना सदरची तारीखसुध्दा सांगता आली नाही. त्यांनी अर्जाची तारीख दि. 19.10.2006 सांगितली. दाखल केलेल्या कागदपत्राप्रमाणे त्यांनी दि. 16.2.2006 रोजी मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल, जलाराम नगर, अमरावती यांचेकडे Information regarding staff of

1) Teaching and Non teaching in 1997-1999

2) H.M. in 1997-1999, 1999-2004 & 2004-2006

3) Class attendants in 1997-1999 of class eighth & Nineth

सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. Notes – Attached one Post Card & one envelope. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दाखल केलेल्या अपीलाप्रमाणे प्रथम अपील दि. 28.3.2006 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद अमरावती याचेकडे दाखल केलेले होते. त्याबद्यलचीही तोंडी माहिती त्यांनी सांगितली नाही. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली किंवा नाही त्याबद्यलही त्यांनी तोंडी सांगितले नाही. मात्र माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 19.10.2006 राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 16.2.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने उत्तरवादी यांचे म्हणण्याप्रमाणे दि. 28.2.2006 रोजी अपीलकर्ता यांना यु.पी.सी.ने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सांगितले त्याकरीता डाक बुकाचे छायांकित प्रत दाखल केलेली आहे त्यावर पोस्टाचा स्टॅम्प आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरची माहिती त्यांना पोस्टाने उपलब्ध झालेली नाही. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली होती असे दिसते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या अंती दि. 29.5.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना दि. 10.6.2006 पर्यंत संबंधितांना माहिती द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. तसेच दि. 24.7.2006 रोजी निर्णय घेवून संबंधितांना कळविले असा खुलासा दाखल केला आहे. त्यावर मुख्याध्यापक यांनी अपीलकाराने दि. 28.2. 2006 रोजी पोष्टाने माहिती दिली. पुन्हा त्यावर 2.5.2006 रोजी आपल्या कार्यालयात

सुनावणी झाली असता माहिती दिल्याचे दिसून आले. करीता पुन्हा अपीकारांनी माहितीच्या अधिकाराखालील माहिती मागितली तर पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अजुनही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु ज्यावेळेस यु पी सी ने माहिती पाठविलेली दिसून येते त्यावेळेस त्या प्राधिकरणाकडून त्या प्रकरणात कार्यवाही पूर्ण झाल्याचे गृहीत धरावे लागते. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असेही सांगितले की पोस्टामध्ये त्याबाबतची चौकशी झालेली होती व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु पोस्टानी माहिती पाठविलेली असल्यामुळे व ती मिळाली नसली तरी अपीलकर्ता यांना सदरची माहिती आता पुन्हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून पाच दिवसाचे आंत रजिस्टर पाष्टानी विनामुल्य माहिती ही त्यांनी अर्जात दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 19.4.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1511-1513

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1409/2007 व अपील कमांक 1410/2007.**

**अपील कमांक 1409/2007**

श्री देवेन्द्र शिलपतराव पर्वतकर
द्वारा–श्री सुभाष जवंजाळ, शिवशक्ती नगर,
सूतगिरणी रोड, अमरावती ..... अपिलकर्ता

विरुध्द

1) श्री एस. के. पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अमरावती
2) श्री प्रदिप नानोटे,
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल,
जलाराम नगर, अमरावती ..... उत्तरवादी

**अपील कमांक 1410/2007**

श्री प्रभाकर रामराव धुरंधर
द्वारा अशोक नाईक, कैलास नगर,
गोपाल नगर जवळ, बडनेरा रोड, अमरावती.

विरुध्द

1) श्री एस. के. पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अमरावती

2) श्री प्रदिप नानोटे,
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल,
जलाराम नगर, अमरावती ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपील क्रमांक 1409/2007 मध्ये दिनांक 17.10.2007 रोजी अपील क्रमांक 1410/2007 मध्ये दि. 18.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. दोनही अपीलकर्ता हजर आहेत. व व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1409/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.2.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल, जलाराम नगर, अमरावती यांचेकडे Information regarding 1) Approval Teaching and Non teaching staff 2005-05-06
2) 2004-2006 Pay bill slip
महिती रजिस्टर पोष्टाने मागितलेली दिसून येते.

अपील क्रमांक 1410/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे Information regarding inspection notes 1997-1999. Copy of the Management body 1997-1999.
अशी महिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.

4. सदरच्या दोनही अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध नाही म्हणून दोनही अपीलकर्त्यांनी दि. 28.3.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्य.) याचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.3.2006 रोजी दिलेला दिसून येतो. परंतु सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे व माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे वर नमूद केल्याप्रमाणे दोन द्वितीय अपीले दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांच्या दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 28.2.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली होती असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सांगितले व त्याप्रमाणे जा. क्र. एसजीएचएएमटी/71/06 व जा. क्र. एसजीएचएएमटी/72/06 व त्याकरीता प्युन डाक बुकमध्ये युपीएससी ने माहिती पाठविली व त्यावर पोष्टाचा स्टम्प आणि शिक्का आहे असा पुरावा सादर केलेला आहे. परंतु दोनही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरचे पत्र त्यांना मिळालेली नाही. त्यांना इतर सर्व पत्रे मिळाली होती. सदरची दोनही पत्रे त्यांना मिळालेले नाही. त्यांनी रजिस्टर पोष्टाने माहिती मागितलेली होती खर्च भरण्याची तयारी होती परंतु त्यांना खर्च मागितला नाही व माहितीही उपलब्ध करुन दिली नाही. ''प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.7.2006 रोजी दिलेला असून असे दिसून येते की ''सुनावणी दौरान असे निदर्शनास आले अर्जदाराला दि. 28.2.2006 ला युपीएससी द्वारे माहिती पाठविण्यात आली होती. अर्जदाराला विचारणा केल्यानंतर माहिती मिळाली नाही व आम्हाला माहिती पाहिजे आहे अशी विनंती करण्यात आली.'' माहिती देण्याकरीता दि. 2.5.2006 ला मुख्याध्यापकाना माहिती पुरविण्याकरीता निर्देश दिले परंतु माहिती देण्यात आली नाही. पुन्हा मुख्याध्यापकाना दि. 10.5.2006 पर्यंत माहिती देण्याकरीता कळविले. मुख्याध्यापकाचे पत्र क्र. एस जी एस/309/06 दि. 14.6.2006 नुसार अपीलकाराना पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल कळविले. वरील माहिती वेळेवर न दिल्यामुळे मुख्याध्यापक स्वतः

जबाबदार आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु दि. 14.6.2006 रोजी अपीलकारानी माहितीच्या अधिकारातील मुख्याध्यापकाना माहिती मागितली व अपीलकाराला दि. 28.2.2006 रोजी पोस्टानी माहिती दिली. पुन्हा त्यावर 2.5.2006 रोजी आपल्या कार्यालयात सुनावणी झाली असता माहिती दिल्याचे दिसून आले करीता पुन्हा अपीलकाराने माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली तर पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल करीता आपले माहिती करीता सादर असे शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना कळविलेले दिसून येते. पुन्हा दि. 8.8.2006 रोजी मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना दि. 28.2.2006 ला यु पी सी ने माहिती दिल्यामुळे मुख्याध्यापक जबाबदार राहणार नाही असे कळविलेले दिसून येते. कोणत्याही प्राधिकरणाने किंवा अधिका–याने कोणत्याही प्रकरणातील निर्णयाच्या संदर्भामध्ये सदरचा निर्णय हा जावक क्रमांक देवून पोष्टानी पाठविला असल्यास तसा पुरावा असल्यास ती प्रक्रिया पूर्ण झाली असे गृहित धरले जाते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की पोष्टानीच पाठविले नसले तर त्यांना मिळणार नाही. परंतु डाक बुकामध्ये पोष्टाचा स्टॅम्प दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी तोंडी असेही सांगितले की पोष्टामध्ये चौकशी झालेली होती. पुन्हा अपीलकर्ता यांनी असे सांगितले की प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये त्यांचे अपील होते व माहिती न मिळाल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात आले. परंतु प्रशासकीय न्यायाधिकरणास कोणत्याही प्रकारची माहिती पुराव्यादाखल मागविण्याचा अधिकार असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्या प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे सदरची माहिती मागविली असती तर ती मुख्याध्यापकाना सादर करावी लागली असती व तशी मुख्याध्यापकानी सादर केली होती असे सांगितले. त्यामुळे सदरची माहिती न मिळाल्यामुळे अपील खारीज झाले हे म्हणणे गृहित धरता येणार नाही. व तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती आजही पुन्हा हवी असली तर जन माहिती अधिकारी सदरची

माहिती दोनही अपीलकारांना रजिस्टर पोष्टाने विनामुल्य पाठविणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे दोनही अपीले हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून त्यांनी त्यांचे दि. 16.2.2006 च्या अर्जावर दिलेल्या पत्त्यावर अर्जातील मागितलेल्या प्रमाणे मुद्येनिहाय माहिती छायांकित प्रतिसहित रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 19.4.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1514-1518

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक /2007.**

श्री

रा. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

2) जन माहिती अधिकारी तथा ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ..200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. ..200 रोजी

महिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ..2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी याचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. ..2006 रोजी

सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर अंशतः मंजुर खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांना दि. ..200 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक .4.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने त्यांच्या दि. 17.8.2006 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती छायांकित प्रतिसह विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच दि. 7.9.2006 चे पत्र हे संशयास्पद आहे असे दिसत असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/- शास्ती लादण्यात येत असून आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी जबाबदारी निश्चित ठरवून दरमहाच्या वेतनातून वसुल करुन तसे आयोगास तीन महिन्याचे आत अहवाल सादर करावा.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1667/2007, 1668/2007, 1669/2007.**

श्री झियाउद्दीन फिरोज घुलाम माहिउद्दीन

रा. किदवाई ग्राऊंड जवळ लष्करीबाग, नागपूर 17. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

उप कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक 30.4.2007, 27.6.2007 रोजी दोन अशी एकुण तीन द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता व प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी रजेवर असल्यामुळे पुढील तारीख मिळावी अशी विनंती केलेली आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जन माहिती अधिकारी हे रजेवर जरी असले तरी त्यांच्या पदाचा अधिभार ज्या अधिका—याला

दिलेला असतो त्यांनी आयोगापुढे सुनावणीस हजर राहणे आवश्यक आहे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी त्यांनी आयोगापुढे सदरच्या तीनही अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाही व त्यामुळे त्यांच्या पुढील तारखा मिळण्याच्या संदर्भामध्ये त्यांचे अर्ज नामंजुर करण्यात आलेले आहे.

2. अपील क्र. 1667/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 11.8.2006 रोजी

a) Certified copy of (L.P.C.) Last Pay Certificate

b) Total leave account uptill now

c) Duplucate Service Book (Complete)

माहितीचा कालावधी 1.4.1986 ते 31.12.2005 असा दिलेला आहे. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांनी स्वतःची आहे व ती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा त्यासंदर्भामध्ये पत्रव्यवहार सुध्दा केलेला नाही. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते स्वतः माहिती अधिकारी यांचेकडे गेंले होते परंतु ते अर्जसुध्दा घेण्यास तयार नाही व त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज पोस्टाने सुध्दा पाठविलेला होता. माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. 13.9.2006 रोजी प्रथम अपील हे व्यक्तिशः प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. परंतु सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय त्यांनी दिलेला नसल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले. यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन तर दिली नाहीच परंतु सदरची माहिती ही उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ सुध्दा करीत आहे असे दिसते व

त्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे की जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा ताकीद देणे आवश्यक आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

3. अपील क्र. 1668/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 26.4.2007 रोजी

Order No. with date by which and whose order you are stopped/dwithheld my salary (pay & allowances) from 1-8-1990 to 19-12-2005.

माहितीचा कालावधी 1.8.1990 ते 31.12.2005 असा दिलेला आहे. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांची स्वतःची आहे व ती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 6.6.2007 रोजी उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी उपरोक्त संदर्भिय विषयान्वये माहितीचे अधिकार अंतर्गत दि. 1.8.90 ते 19.12.2005 पर्यंत पगार व भत्ते का अदा करण्यात आलेले नाही अशी माहीती मागविण्यात आलेली आहे. परंतु आपण दि. 1.8.90 ते 19.12.2005 पर्यंत अनाधिकृत गैरहजर होतें. त्यामुळे तो गैरहजेरीचा कालावधी हा अकार्यदिन करण्यात येत आहे. असे संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये आपणास कळविण्यात आले आहे. त्यामुळे सदर्हु कालावधी पगार व भत्ते अदा करण्यात आलेले नाही. हे आपणा माहीत असुन सुध्दा जाणुन बुजुन माहीतीचा अधिकाराचा दुरुपयोग करुन माहीती मागविणे हे योग्य नाही याची नोंद घ्यावी असे अपीलकर्ता यांना दि. 6.6.2007 रोजी कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या पत्रामध्ये संदर्भ म्हणून 1) अपील दि. 25.5.2007 (यापुर्वी अर्ज केलेला नाही). 2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपुर यांचे पत्र क्र. जिपना/बांध/का.1(6)/2827/03 दि. 29.7.2003

असा संदर्भ दिलेला दिसून येतो. परंतु 26.4.2006 चे पत्र कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि. प. नागपूर यांनी उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) उपविभाग हिंगणा यांना संदर्भ 3 नुसार श्री झियाउद्यीन फिरोज यांना सेवेतुन कमी करण्यात आले होते. त्या विरोधात संदर्भ क्र 1 तृतीय कामगार न्यायालयामध्ये प्रकरण क्र. 317/03 चे दि. 10.10.2005 नुसार त्यांना कामावर घेण्याचे व संदर्भ 3 चे आदेश रद्य करण्यात आले. व त्याबाबतचे पत्र हे स्वयंस्पष्ट आहे असे आयोगाचे निदर्शनास अपीलकर्ता यांनी आणले व त्यामुळे त्यांनी माहिती मागितली होती असे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला नही. तसेच त्यांचा माहितीचा अर्ज हा स्विकारला जात नव्हता म्हणून त्यांनी रजिस्टर पोस्टाने माहितीचा अर्ज दि. 26.4.2007 रोजी पाठविलेला आहे व प्रथम अपीलात सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 6.6.2007 रोजी पत्र हे दिशाभूल करणारे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळून येतात व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलाचा निर्णय न दिल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1669/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.4.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उपअभियंता यांचेकडे "Action taken report of letter No.1038 Dt.23.3.2006 from the office of the Finance Dept. Z.P.Nagpur and copy of Deputy Engineer Z.P.(W) Sub Division Nagpur for information." (Copy attached).

माहितीचा कालावधी 2006 ते 2007 "Last Paid Certificate according pay and allowances with deduction of G.P.F. etc. Regarding (my self)

Ziauddin Firoz, C.R.T.E. Labour Transferred to Z.P.(W) Sub Division Hingna.”

माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन सदरचा अर्ज वैयक्तिकरित्या स्विकृत करीता नाही म्हणून रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आला असे अपीलकर्ता यांनी सांगितले. सदरच्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती उपलबध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 28.5.2007 रोजी कार्यकारी अभियंता यांनी उपअभियंता जि. प. बांधकाम उपविभाग हिंगणा यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्राच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक 14.6.2007 रोजी कार्यकारी अभियंता यांना उपअभियंता जि. प. बांधकाम उपविभाग नागपूर यांचेकडून न मागविता आपण उपविभाग हिंगणा यांचेकडून मागितलेली आहे. वास्तविक पाहता जेथे मी कार्यरत होतो तेथून माझी माहिती मागितली असती तर ती त्वरित मिळाली असती आपण चुकीचे ठिकाणहुन माहिती मागविल्यामुळे माहिती अजून पावेतो प्राप्त होवू शकली नाही असे त्यांचे निदर्शनास आणलेले दिसते तरी सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यास उपलबध करुन दिली नाही. तत्पूर्वी दि. 5.6.2007 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पत्र पाठविलेले दिसून येते व त्यात संदर्भ क्र. जिपना/बांध/का.1(6)3243/06 कार्यकारी अभियंता जि. प. बांधकाम नागपूर दि. 28.5.2007 अन्वये वरिष्ठ लेखा अधिकारी यांचे पत्र क्र. 1038/06 दि. 23.3.2006 अन्वये आपले अंतीम वेतन पत्रक जि. प. बांधकाम उपविभाग नागपूर यांचेकडून प्राप्त न झाल्याचे व सेवापुस्तक अप्राप्त असल्याने भ.नि.नि. वर्गणी कपात न केल्याचे कळविण्यात आलेले होते. तसेच या कार्यालयाचे पत्र क्रमांक 494 दि. 20.4.06 नुसार कळविण्यात आलेले होते. तरी आपली भ.नि.नि. वर्गणी

मा. का.अ. बांध. जि.प. नागपूर यांचे पत्र क्र. 2886 दि. 20.5.06 अन्वये वेतन निश्चित केल्यानंतर नियमाप्रमाणे आपली भ.नि.नि. वर्गणी कपात रु. 200/– माहे नोव्हें. 06 पासून प्रमाणक क्र. 723 दि. 16.12.06 करण्यात आलेली आहे. जि. प. बांधकाम उपविभाग नागपूर या कार्यालयातून अंतीम वेतन पत्रक प्राप्त झालेले नाही. तरी या कार्यालयातून अंतीम वेतन पत्रक देता येणार नाही. परंतु दर महिन्यात पगार पत्रक देण्यात येते. तरी माहितीचा अधिकार 2005 अन्वये आपणास माहिती देण्यात येत आहे. सहपत्र : दुय्यम सेवा पुसतक, ऑर्डर प्रत, माहे मे 2007 पगार पत्रक असे दिसून येते. अशी माहिती उपलब्ध झाली असली तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी नवीन वेतन पत्रक तयार केले होते. मागील 17/18 वर्षाची माहिती नाही व त्यामुळे दुय्यम सेवा पुस्तकामध्ये सुध्दा त्याच कालावधीची कोणत्याही प्रकरणाची नोंद घेतली नाही व त्यामुळे त्यांना ही माहिती अपुर्ण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना त्यांची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कर्तव्य आहे की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदीप्रमाणे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाल्यावर त्यांनी सदरच्या प्रथम अपीलामध्ये सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होईल अशा त–हेने कारणमिमांसा देणारा निर्णय देणे हे बंधनकारक आहे. परंतु सन 2007 मध्ये सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी हे बेजबाबदार आहे असे दिसून येते. व त्यामुळेच अर्जदारांना वारंवार माहिती मागण्यासाठी अर्ज करावे लागतात असेही दिसून येते व अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 1667/2007, 1668/2007, 1669/2007 हे मंजूर करण्यात येवून अपीलकर्ता यांच्या अनुक्रमे दिनांक 30.4.2007, 27.6.2007 च्या दोन अर्जा प्रमाणे अशा एकूण तीन अर्जाच्या संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचं आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) सदरच्या दोनही अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांच्या अधिनियमाच्या कलम 6 (1) प्रमाणे वर नमूद केलेल्या दोनही अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून पंधरा दिवसाचे आंत करण्यात यावा. अन्यथा प्रत्येक अपीलाच्या संदर्भामध्ये प्रत्येकी रु. 5000/– ची शास्ती कायम करण्यात येईल.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 9.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord 1522-1528

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक /2007.**

श्री

रा. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

2) जन माहिती अधिकारी तथा ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ..200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. ..200 रोजी

महिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ..2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी याचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. ..2006 रोजी

सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर अंशतः मंजुर खारीज करण्यास पात्र आहे.

<u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांना दि. ..200 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक .4.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक /2007.**

श्री

रा. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

2) जन माहिती अधिकारी तथा ..... **उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ..200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. ..200 रोजी

महिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ..2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी याचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. ..2006 रोजी

सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर अंशतः मंजुर खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांना दि. ..200 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक .4.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord